**<u>ठळक बातम्या</u>**

- सेमीकॉन २०२६ परिषदेचं प्रधानमंत्र्यांच्या हस्ते उद्घाटन

- देशव्यापी सेवासंकल्प अभियानाला प्रारंभ

- ७९व्या हैद्राबाद मुक्तीदिनानिमित्त तेलंगणात आणि महाराष्ट्रातल्या मराठवाड्यात विविध कार्यक्रम

- अमेरिकन फेडरल रिझर्व्हच्या व्याजदरात २०२३ नंतर प्रथमच वाढ

**आणि**

- इंधनावरच्या विंडफॉल टॅक्समधे कपात

**<><><><><>**

भारतातली सेमीकंडक्टर परिसंस्था वेगाने विस्तारत असून यातून नवोन्मेष, गुंतवणूक आणि विकासाच्या नव्या संधी उपलब्ध होत आहेत, असं प्रतिपादन प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज केलं. नवी दिल्लीत सेमीकॉन २०२६ परिषदेचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते.

***होल्ड… बाईट १ - प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

या यशात उद्योगजगताचं मोठं योगदान असून या यशाचे ते भागीदार आहेत, असं मोदी म्हणाले. सेमीकंडक्टर क्षेत्रात सरकारनं मोठ्या सुधारणा केल्या असून उद्योगजगताला सर्वतोपरी मदत करण्याचं आश्वासन त्यांनी दिलं. कुशल मनुष्यबळ उपलब्ध व्हावं याकरता अभियांत्रिकीचं शिक्षण घेणाऱ्या १ लाख विद्यार्थ्यांना सेमीकंडक्टर क्षेत्रात प्रशिक्षण दिलं जाईल, अशी माहिती त्यांनी दिली.

***होल्ड… बाईट २- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी***

डेटा सेंटर्समुळे निर्माण झालेली विजेची मोठी गरज लक्षात घेऊन याही क्षेत्रात भारत गुंतवणूक करत आहे, असंही मोदी यांनी नमूद केलं.

देशाच्या पुढच्या कित्येक दशकांच्या विकासासाठी सेमीकंडक्टर क्षेत्र अतिशय महत्त्वाचं असून सेमीकॉन योजनेच्या दुसऱ्या टप्प्यात सेमीकंडक्टर उद्योगाच्या विकासासाठी ६

स्तंभांच्या आधारे काम करू, अशी माहिती इलेक्ट्रॉनिक्स आणि माहिती तंत्रज्ञान मंत्री अश्विनी वैष्णव यांनी यावेळी दिली.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वाढदिवसानिमित्त मान्यवरांनी त्यांना शुभेच्छा दिल्या आहेत. **राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, आणि उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन** यांनी समाजमाध्यमावरच्या संदेशांमधून मोदी यांचं अभिनंदन केलं आहे. गुजरातचे मुख्यमंत्री आणि त्यानंतर प्रधानमंत्री म्हणून गेल्या २५ वर्षांमध्ये देशाच्या उभारणीत त्यांनी दिलेल्या योगदानाची राष्ट्रपतींनी प्रशंसा केली. मोदी यांच्या नेतृत्वाखाली  भारत आज जागतिक पातळीवर आपली चमक दाखवत असून सर्वात वेगाने वाढणाऱ्या अर्थव्यवस्थांपैकी एक आहे, असं उपराष्ट्रपती सी. पी. राधाकृष्णन यांनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

संरक्षणमंत्री राजनाथ सिंह,  केंद्रीय गृहमंत्री अमित शहा, माहिती आणि प्रसारणमंत्री अश्विनी वैष्णव यांनीही मोदी यांना शुभेच्छा दिल्या आहेत. काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खर्गे आणि लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनीही प्रधानमंत्री मोदी यांना वाढदिवसाच्या शुभेच्छा दिल्या आहेत.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या राजकीय कारकिर्दीला २५ वर्षं पूर्ण होत असून, त्यानिमित्त राज्याराज्यात सेवा संकल्प अभियान सुरु झालं आहे. या काळातले महत्वाचे निर्णय, प्रकल्प आणि विधायक घडामोडींचा आढावा आपण आजपासून घेणार आहोत. आज ऐकूया मुंबई ते न्हावा शेवा अटल सेतूविषयी माहिती.

**- - - होल्ड - VC - - -**

*(मुंबईतल्या वाहतूक कोंडीवरती उपाय म्हणून तयार करण्यात आलेला शिवडी - ते न्हावा शेवा अटल सेतू अभियांत्रिकी विश्वातला चमत्कार मानला जातो. प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते १२ जानेवारी २०२४ रोजी या पुलाचं उद्घाटन झालं.*

*या पुलाची एकूण लांबी २१ किलोमीटर असून त्यातला साडेसोळा किलोमीटर लांबीचा भाग समुद्रात उभारण्यात आला आहे. या पुलामुळे मुंबईहून नवी मुंबईकडे प्रवास करताना वेळेत आणि इंधनात बचत होते आहे. शहरातल्या इतर रस्त्यांवरचा वाहतुकीचा भारही कमी झाला आहे.*

*हा पूल उभारताना पर्यावरणस्नेही दृष्टिकोन ठेवल्यामुळे या परिसरातल्या फ्लेमिंगो पक्ष्यांचा अधिवासही अबाधित राहिला आहे.)*

<><><><><>

देशभरात आजपासून 'स्वच्छता ही सेवा' अभियानही सुरु झालं. येत्या १७ ऑक्टोबरपर्यंत चालणाऱ्या या अभियानाची संकल्पना 'स्वच्छतेत सहयोग, स्वच्छ भारत, विकासित भारत' अशी आहे. या काळात देशभरात १२ कार्यक्रम आयोजित केले जाणार असून यामधून राष्ट्र उभारणी आणि सेवा कार्यांवर भर दिला जाणार आहे.

<><><><><>

७९ वा हैदराबाद मुक्तिसंग्राम दिन आज साजरा होत आहे. १७ सप्टेंबर १९४८ रोजी हैदराबाद संस्थान निजामाच्या राजवटीतून मुक्त होऊन भारतीय संघराज्यात विलीन झालं. तत्कालीन केंद्रीय गृहमंत्री सरदार वल्लभभाई पटेल यांच्या नेतृत्वाखाली ‘ऑपरेशन पोलो’ या पोलिस कारवाईद्वारे भारतीय सैन्याने हैदराबाद ताब्यात घेऊन निजामाचा पराभव केला. हैदराबाद मधला मराठवाडा प्रांत मुक्त होऊन, भाषावार प्रांतरचनेत तो महाराष्ट्रात सामील करण्यात आला. या मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मराठवाड्यात सर्वत्र विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते छत्रपती संभाजीनगर इथं ध्वजारोहणाचा कार्यक्रम झाला. मराठवाड्यातल्या आठही जिल्ह्यात पालकमंत्र्यांच्या हस्ते ध्वजवंदनेचा कार्यक्रम झाला.

<><><><><>

अमेरिकेच्या फेडरल रिझर्व्हनं वाढत्या महागाईवर नियंत्रण मिळवण्यासाठी २०२३ नंतर पहिल्यांदाच आपल्या मुख्य व्याजदरात पाव टक्के वाढ केली आहे. यामुळे बँकेचा मुख्य व्याजदर आता सुमारे ३ पूर्णांक ९ दशांश टक्क्यांवर पोहोचला आहे. व्याजदर वाढीमुळे आगामी काळात गृहकर्ज, वाहन कर्ज आणि क्रेडिट कार्डवरच्या कर्जाचा भार वाढण्याची शक्यता निर्माण झाली आहे. चालू वर्षात व्याजदरात आणखी एकदा वाढ करून तो ४ पूर्णांक १ दशांश टक्क्यांपर्यंत जाईल अशी शक्यता बँकेच्या तिमाही अंदाजात वर्तवण्यात आली आहे.

अमेरिकेतल्या आगामी मध्यावधी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर महागाईवरच्या उपाययोजनांनी जोर पकडला आहे. फेडरल रिझर्व्हच्या निर्णयाचं अमेरिकेचे अध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी समर्थन केलं आहे.

**<><><><>**

केंद्र सरकारने पेट्रोल, डिझेल आणि एव्हिएशन टर्बाइन फ्युएलच्या निर्यातीवरचा विंडफॉल टॅक्स कमी केला आहे. नवीन दर लागू झाले आहेत. पेट्रोलियम मंत्रालयाने जारी केलेल्या अधिसूचनेनुसार, रस्ते आणि पायाभूत सुविधा उपकरासह डिझेल निर्यातीवरचा विशेष अतिरिक्त उत्पादन शुल्क दर २५ रुपयांवरून २० रुपये प्रति लिटर करण्यात आला आहे. तर एटीएफचं निर्यात शुल्क १९ रुपयांवरून १५ रुपये प्रति लिटर इतकं करण्यात आलं आहे.  त्याचप्रमाणे पेट्रोलवरचं निर्यातशुल्क कमी करून ते ५० पैसे प्रति लिटर करण्यात आलं आहे.

**<><><><>**

केंद्रीय  कुटुंब कल्याण मंत्रालयानं अनुसूची एच, एच1 आणि एक्स अंतर्गत समाविष्ट असलेल्या औषधांची नियामक चौकट बळकट करण्यासाठी, ‘ड्रग्ज रूल्स, अर्थात औषध नियम १९४५’ मध्ये सुधारणा करण्याचा प्रस्ताव मांडला आहे. डॉक्टरांच्या चिठ्ठीशिवाय या औषधांची खरेदी करता येत नाही. प्रस्तावित सुधारणांमधून या औषधांची अनधिकृत उपलब्धता आणि विक्रीशी संबंधित त्रुटी दूर करण्याचा प्रयत्न असून, अतिरिक्त नियामक उपाय म्हणून वैद्यकीय दुकानांमध्ये सीसीटीव्ही देखरेख अनिवार्य करण्याची शिफारस करण्यात आली आहे. मंत्रालयाने प्रस्तावित सुधारणेबाबत संबंधित घटक आणि नागरिकांकडून येत्या ३० दिवसांमध्ये हरकती आणि सूचना मागवल्या आहेत.

**<><><><>**

महाराष्ट्रात मराठा आरक्षणासाठी सुरु केलेलं उपोषण मनोज जरांगे यांनी मागे घेतलं असून  त्यांच्या निर्णयाचं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी स्वागत केलं आहे. ते आज छत्रपती संभाजीनगर इथं ‘मराठवाडा मुक्ती दिनानिमित्त’, आयोजित ध्वजारोहण समारंभात बोलत होते. जरांगे यांच्या उर्वरित मागण्यांबाबतच्या कायदेशीर बाबी यापूर्वीच स्पष्ट करण्यात आल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**<><><><>**

हिंदी पखवाड्यानिमित्त देशभरात कालपासून हिंदी भाषेच्या प्रोत्साहनार्थ विविध उपक्रम राबवण्यात येत आहेत. आकाशवाणी मुंबईच्या नवीन प्रसारण भवनात तसंच केंद्रीय विक्रय एकांशातर्फे काल हिंदी दिवस आणि हिंदी पखवाडा कार्यक्रमाचं उद्घाटन झालं. प्रसिद्ध अभिनेत्री सोनाली कुलकर्णी प्रमुख पाहुण्या म्हणून उपस्थित होत्या.

**<><><><><>**

भारत आणि अफगाणिस्तान क्रिकेट संघांमध्ये टी ट्वेंटी मालिकेतला तिसरा आणि अंतिम सामना आज नवी दिल्लीच्या अरुण जेटली मैदानावर होणार आहे. सामना संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होईल. तीन सामन्यांच्या मालिकेत भारतानं २-० अशी विजयी आघाडी घेतली आहे.

**//<><><><><>//**